# THE INDIAN INSTITUTE OF PUBLIC ADMINISTARATION
## MAHARASHTRA REGIONAL BRANCH
## भारतीय लोक प्रशासन संस्था
## महाराष्ट्र शाखा

Tel : 2202 4243/2285 4156
Ext. : 3430
Dir : 2279 3430.
Email- sn_kulkarni@yahoo.co.in
iipamrb@gmail.com

Room No.13, Ground floor, Mantralaya
MUMBAI – 400 032.

**सुयोग्य प्रसिध्दीसाठी टिप्पणी**

**भारतीय लोक प्रशासन संस्था, महाराष्ट्र विभागीय शाखेने सन २०११-२०१२ करिता आयोजित केलेली कै. श्री. बी.जी. देशमुख वार्षिक निबंध स्पर्धा**

मुंबई दि. १६ फेब्रुवारी २०१२.

भारतीय लोक प्रशासन संस्थेच्या महाराष्ट्र विभागीय शाखेने सन २०११-२०१२ करिता कै श्री. बी.जी. देशमुख वार्षिक निबंध स्पर्धा खालील विषयावर आयोजित केलेली आहे.

१. नव्याने उदयास येणा-या बहुध्रुवीय जगतातील भारताची सुरक्षेसंबंधित आव्हाने
२. प्रजासत्ताक भारतातील आणि सुवर्णमहोत्सवी महाराष्ट्रातील लेखापरिक्षणाची भूमिका
३. भारतातील लोकप्रशासनांत कै. श्री. यशवंतराव चव्हाण यांचे योगदान
४. भारतातील विशेषतः महाराष्ट्राच्या संदर्भात अन्नसुरक्षेपुढील आव्हाने
५. महाराष्ट्रांच्या १२व्या पंचवार्षिक योजनेने कशावर लक्षकेंद्रीत करावे- प्राथम्य क्रमाने करावयाच्य पाच बाबी

२. या स्पर्धेसाठी पहिले बक्षिस रुपये ५०००/-, दुसरे रुपये ४०००/-, तिसरे रुपये २५००/-, व उत्तेजनार्थ रुपये २०००/- अशी एकूण चार पारितोषिके देण्यात येतील.

३. निबंध इंग्रजी किंवा मराठी भाषेत कोणत्याही एकाच विषयावर ३००० शब्दांपेक्षा कमी आणि ५००० शब्दांपेक्षा जास्त नसावा. स्पर्धेत भाग घेण्यापूर्वी शालेय तसेच पदवीधर नसलेल्या विद्यार्थ्यांना विनंती करण्यात येते की, निबंध पदव्युत्तर किंवा उच्च दर्जाचा असावा याबाबत त्यानी नोंद घ्यावी. निबंध कागदाच्या एकाच पृष्ठभागावर टंकलिखित करुन टोपणनांवाने तीन प्रतीत सादर करावा. स्पर्धकाने निबंधावर आपले नांव किंवा कोणत्याही प्रकारची ओळख नमूद करु नये. निबंध बंद लिफाफ्यात ठेवून सोबत स्पर्धकाचे नाव व पत्ता तसेच टोपणनाव असलेला कागद ठेवावा.

४. संस्थेत मिळालेल्या निबंधाच्या प्रती परत करण्यात येणार नाहीत.

पा.२/- पहा.

५. कोणालाही पारितोषिक न देण्याचा किंवा पारितोषिकाची रक्कम कमी करण्याचा अधिकार संस्था राखून ठेवीत आहे. परिक्षकांचा निर्णय बंधनकारक राहील. संस्थेच्या शाखेच्यावतीने घेण्यात येणाऱ्या स्पर्धेत पारितोषिक विजेता ठरलेल्या व्यक्ती पुन्हा त्याच किंवा त्यापेक्षा कमी पारितोषिकास त्यानंतर तीन वर्षे पात्र ठरणार नाहीत.

६. निबंधाच्या तीन प्रती व टोपण नांव असलेला लिफाफा एका मोठया लिफाफ्यामध्ये बंद करुन त्यावर कै. श्री. बी.जी. देशमुख वार्षिक निबंध स्पर्धा २०११-२०१२ असे नमूद करावे व तो सचिव, भारतीय लोक प्रशासन संस्था, महाराष्ट्र विभागीय शाखा, खोली क्रमांक १३, तळमजला, मंत्रालय (मुख्य) मुंबई- ४०० ०३२ या पत्त्यावर दिनांक ३० एप्रिल २०१२ पर्यंत पाठवावा. अधिक माहितीसाठी कृपया दूरध्वनी क्रमांक २२७९३४३० (थेट) किंवा २२०२४२४३/२२८५४१५६ विस्तारित क्रमांक ३४३० वर तसेच इमेल :- (१) sn_kulkarni@yahoo.co.in (२) iipamrb@gmail.com द्वारे संपर्क साधावा.

(एस.एस. क्षत्रिय)
सचिव, भारतीय लोक प्रशासन संस्था तथा
प्रधान सचिव, महसूल व वनविभाग